## संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

### सूचना

येत्या दीक्षांत समारंभामध्ये आचार्य पदवी संपादण्यास आवेदन पत्र सादर केलेल्या सर्व आचार्य पदवीकांक्षींना कळविण्यात येते की, विद्यापीठाचा 37 वा पदवी प्रमाणपत्र प्रदान समारंभ दिनांक 21.02.2021 रोजी दुपारी 1.30 वाजता डॉ. के. जी. देशमुख सभागृह, विद्यापीठ परिसर, तपोवन रोड, अमरावती येथे आभासी पध्दतीने संपन्न होत आहे. आचार्य पदवी ग्रहण करु इच्छिणाऱ्या सर्व पदवीकांक्षींनी निर्धारीत केलेल्या पोशाखात तक्ता 'अ' मध्ये दिलेल्या तारखेला व नमूद स्थानी नियोजित वेळेपूर्वी कमीत कमी अर्धा तास अगोदर सभागृहामध्ये नेमलेल्या जागी स्थानापन्न व्हावे.

**तक्ता 'अ'**

| अ.क्र | विद्याशाखेचे नांव | दिनांक व वेळ | आचार्य पदवी वितरण स्थळ |
|---|---|---|---|
| 1. | विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा (Faculty of Science & Technology) | 22.02.2021 12.00 ते 2.00 | डॉ.के.जी देशमुख सभागृह,सं.गा.बा अमरावती विद्यापीठ. |
| 2. | मानव विज्ञान विद्याशाखा (Faculty of Humanities) | 23.02.2021 12.00 ते 2.00 | डॉ.के.जी देशमुख सभागृह,सं.गा.बा अमरावती विद्यापीठ. |
| 3. | आंतर विद्याशाखीय अभ्यास विद्याशाखा (Faculty of Inter-disciplinary Studies) | 24.02.2021 12.00 ते 2.00 | डॉ.के.जी देशमुख सभागृह,सं.गा.बा अमरावती विद्यापीठ. |
| 4. | वाणिज्य आणि व्यवस्थापन विद्याशाखा (Faculty of Commerce & Management) | 24.02.2021 01.00 ते 2.00 | डॉ.के.जी देशमुख सभागृह,सं.गा.बा. अमरावती विद्यापीठ. |

या प्रसंगी पोशाखावर घालावयाचे उत्तरीय (Scarf) विद्यापीठातर्फे पुरविण्यात येईल. आचार्य पदवीकांक्षींना प्रवेशपत्र दाखवूनच खालील तक्ता "ब" मध्ये नमूद केलेल्या वेळापत्रकानुसारच उत्तरीय (Scarf) घेता येईल. तसेच प्रत्येक आचार्य पदवीकांक्षींनी आचार्य पदवी प्रमाणपत्र शुल्क रुपये २००/-- भरणा केल्याची पावती उत्तरीय घेतेवेळी जवळ बाळगावी. पदवी प्रदान समारंभ संपल्यानंतर प्रत्येक पदवीकांक्षींनी नियोजित ठिकाणीच उत्तरीय (Scarf) परत करावे. उत्तरीय (Scarf) परत न केल्यास प्रतिदिन रु.1.00 प्रमाणे विलंब शुल्क आकारण्यात येईल.

-2-

**तक्ता 'ब'**

| अ.क्र. | विद्याशाखेचे नांव | उत्तरीय (Scarf) प्राप्त करण्याची तिथी व वेळ | उत्तरीय (Scarf) प्राप्त करण्याचे स्थळ |
|---|---|---|---|
| 1. | विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा (Faculty of Science & Technology) | 20.02.2021 सकाळी 11.00 ते सायंकाळी 5.00 वाजेपर्यंत | वित्त विभाग. सं.गा.बा अमरावती विद्यापीठ |
| 2. | मानव विज्ञान विद्याशाखा (Faculty of Humanities) | 22.02.2021 सकाळी 11.00 ते सायंकाळी 5.00 वाजेपर्यंत | वित्त विभाग. सं.गा.बा अमरावती विद्यापीठ |
| 3. | आंतर विद्याशाखीय अभ्यास विद्याशाखा (Faculty of Inter-disciplinary Studies) | 23.02.2021 सकाळी 11.00 ते सायंकाळी 5.00 वाजेपर्यंत | वित्त विभाग. सं.गा.बा अमरावती विद्यापीठ |
| 4. | वाणिज्य आणि व्यपस्थापन विद्याशाखा (Faculty of Commerce & Management) | 23.02.2021 सकाळी 11.00 ते सायंकाळी 5.00 वाजेपर्यंत | वित्त विभाग. सं.गा.बा अमरावती विद्यापीठ |

**निर्धारीत केलेला पोशाख** :- **अ)** आचार्य पदवीकांक्षीकरीता ( विद्यार्थी - पुरुष ) पांढरा पॅन्ट, पाढरा सदरा व बंद गळ्याचा कोट अथवा पांढरा पायजामा-धोतर व पांढरा सदरा.

**ब)** आचार्य पदवीकांक्षींकरीता (विद्यार्थीनी - महिला) पांढरी साडी, पांढरे पोलके.

**टिप** :- (१) आचार्य पदवी प्रमाणपत्रामध्ये काही चूक असल्यास ते दुरुस्तीकरीता विद्यापीठ परीक्षा विभागातील सारणी शाखेमध्ये कार्यालयीन कामाचे दिवशी कार्यालयीन वेळात सादर करावे किंवा स्वतंत्र अर्जाद्वारे मूळ प्रमाणपत्रासह पोस्टाने पाठवावे.

(२) या समारंभामध्ये पात्र सर्व आचार्य पदवीकांक्षींना आवेदनपत्रे नोंदणीकृत डाकेने पाठविण्यात आलेली असून सदर आवेदनपत्रे आचार्य पदवी शुल्क रुपये २००/- विद्यापीठ खाती दिनांक १५.०२.२०२१ आणि दि. १८.०२.२०२१ पर्यंच सादर करण्याबाबत कळविण्यात आलेले आहे. तथापी ज्या आचार्य पदवीकांक्षींना नमूद तारखेपर्यंत आवेदनपत्र सादर करता आलेले नाही, अशा पदवीकांक्षींनी दिनांक २०.०२.२०२१ पर्यंत विद्यापीठ परीक्षा विभागातील सारणी शाखेमध्ये प्रत्यक्ष येऊन आवेदनपत्र सादर केल्यास त्याचवेळी प्रवेशपत्र हस्तांतरीत करण्यात येईल. अशा पदवीकांक्षींना पोस्टाद्वारे प्रवेशपत्रे पाठविली जाणार नाहीत.

दिनांक — १३/०२/२०२१

**संचालक**
परीक्षा व मूल्यमापन मंडळ

प्रति,

१) प्रमुख, संगणक केन्द्र, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ यांना विनंती की सदर सूचना विद्यापीठाच्या अधिकृत Website वर उपलब्ध करुन द्यावी.

२) वित्त व लेखा अधिकारी यांना विनंती की, आचार्य पदवीकांक्षींना उत्तरीय वाटपाबाबत आवश्यक कार्यवाही करीता सविनय सादर.

३) सहायक कुलसचिव (सारणी)

४) सहायक कुलसचिव (आचार्य कक्ष)